झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा / सप्रा ३/झोपुआ/१५९९/२०२१
दिनांक : १४/१२/२०२१.

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे भोसरी, स.नं.६४६, सि.स.नं.३०००(पै), येथील साईनाथनगर झोपडपट्टी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर क्षेत्रफळ २८९०.९२ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. आर.के.डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे; आणि

आणि ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व एकूण २८९०.९२ चौ.मी. क्षेत्र अघोषित असलेने तसेच सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, झोपटपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचेकडील झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती अहवाल प्राप्त असलेने, तसेच सक्षम प्राधिकारी क्र.३ यांनी देखील स्थळपाहणी करुन सदृश्य परिस्थिती अहवाल स्वतंत्रपणे सादर केलेला असून मोजणी नकाशानुसार क्षेत्र २८९०.९२ चौ.मी. एवढ्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल असलेमुळे सदरचे एकूण २८९०.९२ चौ.मी. एवढे योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२२/१०/२०२१ रोजीची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र नोव्हेंबर ०४-१०, २०२१ पान क्र. २३-२४ मध्ये तसेच महाराष्ट्र निरोप्या (पुणे) व सांज महानगरी या वृत्तपत्रात दि.२६/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि. २६/१०/२०२१ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; तसेच प्रादेशिक अधिकारी क्र.१, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना देखील सदर नोटीसीची प्रत देणेत आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर दि.२२/१०/२०२१ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पुर्वसूचना नोटीशीस कोणतीही आक्षेप / हरकत विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेले नाहीत;

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.६४६, सि.स.नं.३०००(पै), साईनाथनगर झोपडपट्टी, भोसरी, पुणे
महानगरपालिकेचे नाव :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका

अनुसूची

| गाव | सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (मोजणी नकाशा नुसार व त्रिमिती नुसार) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| साईनाथ नगर झोपडपट्टी, भोसरी | स.नं.६४६ सि.स.नं. ३०००(पै), | एम.आय. डी.सी | २८९०.९२ चौ.मी. | **पुर्वेस** - रस्ता व लागू सि.स.नं.२९२७<br>**पश्चिमेस** - लागू रस्ता.<br>**उत्तरेस** - सि.स.नं.३००० पै.<br>**दक्षिणेस** - सि.स.नं.३०००पै. | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :१४/१२/२०२१.

14.12.21

**(राजेंद्र निंबाळकर)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :-

1. प्रादेशिक अधिकारी क्र१, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेबनगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -१९ :- यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव सादर
2. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
3. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.